# त्या ऑटोचालकाला मानाचा मूजरा

१५ नोव्हेंबरच्या लोकशाहीवार्ताच्या अंकातील लोकसंवाद या सदरातील एका ऑटोचालकाचे पत्र वाचले. त्याबद्दल त्या ऑटोचालकाचे त्रिवार अभिनंदन , शाळांना इतक्या सुट्या कशाला. हा त्या ऑटोचालकाचा मुद्दा अतिशय रास्त आहे दिवाळीच्या दुसऱ्या दिवसापासूनच मन खूप बेचैन होतं. शाळेला इतक्या सुट्या दिल्याबद्दल मनात खंत बाळगून ५ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबरपर्यंत दर दिवशी मन उदास होतं. स्वत:लाच मी गुन्हेगार ठरवलं होतं, इतक्या सुट्या दिल्याबद्दल. अन १५ नोव्हेंबरला एक आशेचा किरण दिसला. चला कोणीही शिक्षक नाही पण किमान एका ऑटोचालकाने संपूर्ण शिक्षकांच्या आणि शिक्षण विभागाच्या डोळ्यात अंजन घातलं.

मी या जाहीर पत्राव्दारे सर्व शिक्षकांना खुले आव्हान करते किमान दहा दिवसांचा पगार त्यांनी त्या त्या शाळांना वापस करावा. म्हणजे पुढच्या वर्षी तरी ही चूक पुन्हा घडणार नाही.

मला वाटत होतं की, कोणीतरी शिक्षकच पुढे येऊन या सुट्यांना नकार देईल. पण हे घडलं नाही जे शिक्षकांकडून घडल नाही ते ह्या सन्माननीय ऑटो चालकाने केलं. त्याचं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे. वास्तविक शाळांना सुट्या मिळणे हे आटोचालकाच्या फायद्याचे. पण त्याने स्वत:चा फायदा पाहिला नाही. या आटोचालकासारखे सर्व नागरिक भारताला लाभले तर खचितच आमच्या भारताचे भविष्य उज्वल ठरेल. या ऑटोचकाला खूप खूप धन्यवाद.

**ऑटो चालकाचे पत्र**

**शाळांना दिवाळीच्या इतक्या सुटया कशाला ?**

दिवाळच्या निमित्ताने शाळांना ८ ते १० दिवसांच्या सुट्ट्या ठीक आहेत. मात्र १५/१६ दिवसांच्या सुट्या म्हणजेच विद्यार्थांना शिक्षणापासून १५/१६ दिवासांचा आराम देण्यासारखे आहे. शाळा सुरू झाल्यानंतर ५ ते ७ दिवस अभ्यासात लक्ष न लागणे आणि दिवाळीच्या वेळी शिक्षणक्रमात १५/१६

दिवसांचा खंड पडणे योग्य वाटत नाही. शिक्षण क्षेत्रांतील अधिकाऱ्यांनी याचा विचार करावा. शाळेतील मास्तरांना तर पगार मिळतोच, त्यांना चिंता नाही. विद्यार्थांना सुट्टी म्हटलं तर अति आनंदच असतो. मात्र माझ्यासारख्या जागरूक पालकांना हा विषय चिंतेचा वाटतो. मी एक ऑटोचालक आहे. शाळेचे विद्यार्थी ने आण करीत असतो. मलासुध्दा सुट्टीची खुशी वाटायला हवी. मात्र त्या उलट मला या सर्व बाबीची मनात चीड निर्माण होते. कारण मी पंधरा दिवस विद्यार्थ्यांची ऑटोने शाळेत ने आण न केल्यास प्रत्येक दिवसाला माझे ३ लिटर पेट्रोलचे पैसे वाचतात. आणि मला सुट्टीचा जो वेळ मिळतो त्यात त्याच ३ लिटर पेट्रोलमध्ये मी तेवढीच रक्कम कमावू शकतो. हा माझा घाटा नसून नफा आहे. हे सर्वच शालेय आटोचालकांना लागू पडते. पण माझा फायदा म्हणून मला सुट्टीची खुशी नको. विद्यार्थ्यांची दिशा आणि दशा बिघडते त्याची मला खंत वाटते.

एक आटोचालक

लोकशाही वार्ता – २२ नोव्हेंबर २०१३